पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/१२/२०२१** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती**ची पाक्षिक सभा **शुक्रवार,** दिनांक **०३/१२/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.वसंत प्रभाकर बोराटे
४. मा.कोमल दिपक मेवानी
५. मा.संगीता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
६. मा.लांडे विक्रांत विलास

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.सुभाष इंगळे - उप आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) स्थळ बदलास मान्यते बाबत.
मा.कोमल मेवानी व मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पी.एम.पी.एम.एल. मधील पुर्व पीसीएमटी चे वर्कशॉप विभागातील १०८ सेवकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये वर्ग करुन घेणेबाबत.
मा.वसंत बोराटे व मा. संगीता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) निविदा क्र.५६/१५,२०२१-२२, प्रभाग क्र.१३ साईनाथ नगर व प्रभागातील विविध ठिकाणी जुने पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसवून स्थापत्य विषयक कामे करावे, या कामाच्या स्वरुपात अंशत: बदल करणे.
मा.संगिता भोंडवे व कोमल मेवानी यांचा प्रस्ताव.

---------

अ) मा.विधी समिती सभा (**कार्यपत्रिका क्रमांक २२**) दि.१८/१०/२०२१ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) मा.विधी समिती सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०१**) दि.१८/११/२०२१ चा सभावृतांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०३/१२/२०२१ विभाग - पाणीपुरवठा प्रकल्प
सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.कोमल मेवानी
संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भाआ/पापु प्रकल्प/अ-१/२५३/२०२१, दि. २९/१०/२०२१.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे उभारवयाच्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी देहू येथील नदीतून जल उपसा करून पाईपलाईन द्वारे पाणी आणणे व इतर अनुषंगिक कामे करणे. या कामांतर्गत देहू येथील बोडकेवाडी बंधाऱ्या जवळ अशुध्द जल उपसा केंद्र ते चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत रायझिंग मेन पाईप लाईन टाकणेचे काम मे.रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे ठेकेदार कामाचे आदेश क्र. पापु/०८/कावि/११०३/२०१९, दि.२१/११/२०१९ अन्वये करीत आहे. सदर कामामध्ये १४०० मि.मी. व १२५० मि.मी. व्यासाचे लोखंडी पाईप पुरविणे व जोडणी करणेचा समावेश आहे. सदर कामाचे मे. डी.आर.ए. कन्सल्टंट हे प्रकल्प सल्लागार आहे. सदरचे काम चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्र ते देहू पर्यंत १४०० मि.मी. जलवाहिनी टाकणेचे आहे. तसेच देवेंद्र राणे चौक ते निघोजे-तळवडे पर्यंत १२५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे चे काम अंतिम टप्प्यात आहे. महानगरपालिकेचे देहू (बोडकेवाडी) येथील के.टी.वेअर येथे आंद्रा पाणीपुरवठा योजनेचे हेडवर्क्स बांधणेचे नियोजन केले होते. तथापि सदर ठिकाणी मुंबई उच्च न्यायालयात श्री. बोडके कुटूंबीय यांनी याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेचा निकाल लवकर लागत नसल्याने व श्री. बोडके हे महानगरपालिकेने सहकार्य करणार नसल्याने लक्षात आल्यानंतर महानगरपालिकेने बोडकेवाडी ते निघोजे तळवडे येथील विविध ठिकाणच्या केटीवेअर मधून अशुध्द जलउपसा करणेचा पर्याय यांचा अभ्यास करुन निघोजे-तळवडे येथून पाणी उपसा करणेचा पर्याय अंतिम केला त्यानंतर तेथे हेडवर्क्स बांधणेकामी जागा ताब्यात घेणे जलसंपदा विभागाची उदभव बदलास परवानगी घेणे इ. बाबींची पुर्तता केली आहे. विषयांकित काम हे चिखली जलशुध्दीकरण केंद्र ते बोडकेवाडी देहू पर्यंत करणेचे नियोजन होते. तथापि सदर काम चिखली जलशुध्दीकरण केंद्र ते निघोजे-तळवडे येथील हेडवर्क्स पर्यंत करणेत येणार आहे. सदर काम वेगाने सुरु असून प्रगतीपथावर आहे. सदर कामामध्ये सुमारे ३.४० कि.मी. लांबीच्या लोखंडी पाईपची बचत होत आहे. आंद्रा धरणाचे पाणी निघोजे-तळवडे येथील के.टी.वेअर मधून उचलून चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्रात आणून शुध्द करणेत येणार आहे. सदर कामे माहे मार्च २०२२ पर्यंत पुर्ण करणेचे नियोजन आहे. तथापि सदर शुध्द पाणी नागरिकांपर्यंत पोहचविणेसाठी

वितरण व्यवस्था उपलब्ध नाही. या सर्व बाबींचा विचार करुन सोनवणे वस्ती (देहू आळंदी रस्ता) ते स्पाईन रोड (चिखली घरकुल योजना) पर्यंत जलवाहिनी टाकूण ती स्पाईन रोडवरील (चिखली घरकुल योजना) मनपाच्या अस्तित्वातील जलवाहिनीस जोडल्यास व से. क्र.२३ वरुन येणारा पाणीपुरवठा बंद करुन चिखली येथील जलशुध्दीकरणाचे शुध्द पाणी नागरिकांना देता येईल. याबाबत सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. मे.डी.आर.ए. कन्सल्टंट यांनी त्यांचेकडील पत्र दि.१४/१०/२०२१ चे पत्रान्वये अभिप्राय दिला आहे. सदर काम तातडीने करावयाचे असल्याने मे. रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचे कामाचे होणा-या बचतीमधून सदरचे काम करता येईल. तसेच याकामी मनपा क्षेत्रात इतरत्र जागोजागी व्हॉल्स बसविणे, पाईपलाईनची आवश्यकती नुसार जागोजागी जोडणी करावी लागणार आहे. यासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करावी लागणार नाही. मूळ निविदेतील निविदा रक्कमेपर्यंत काम करणेत येईल. तरी विषयांकित कामामधून सोनवणे वस्ती (देहू-आंळदी रस्ता) ते स्पाईन रोड (घरकुल योजना) पर्यंत तसेच मनपा क्षेत्रात इतरत्र आवश्यकतेनुसार जागोजागी व्हॉल्स बसविणे व लोखंडी पाईपलाईनची जोडणी करणेच्या स्थळ बदलाबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०३/१२/२०२१ विभाग - विद्युत विभाग

सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.कोमल मेवानी

संदर्भ - मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षेका/काविर/८८/२०२१, दि. ०९/११/२०२१. मा.महापालिका अतिरिक्त आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

जिजामाता हॉस्पीटल येथील कोवीड-19 करिता विद्युत व्यवस्थेचे चालन देखभाल दुरूस्ती व अनुषंगिक कामे करणे या कामास मा.विधी समिती सभा ठराव क्र.32, दि.16/04/2021 अन्वये र.रू.24,98,707/- यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तथापि दि.19/10/2021 रोजी मा. आयुक्त कक्षात झालेल्या बैठकीत मा. आयुक्त सो यांनी जिजामाता रूग्णालयातील २ ऑपरेशन थिएटर ३१ डिसेंबर २०२१ पूर्वी सुरू करणेबाबत आदेश दिलेले आहे. ऑपरेशन थिअटरमधील वातानुकुलन यंत्रणेसाठी आवश्यक एस.एस.प्लेनम, डक्टींग, ग्रील इ. कामाकाज तातडीने करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपरेशन थेटर सुरू करणे शक्य होणार नाही. सदरचे काम करणेसाठी अंदाजे र.रू.18,15,324/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तातडीची बाब असल्याने विषयांकित कामातूनच मा. स्थायी समिती सभेच्या उमेद मान्यतेवर सदरचे वाढीव काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे विषयांकित कामास एकूण र.रू.43,14,031/- एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदर वाढीव खर्च करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२५/१०/२०२१ च्या प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे.

सदर कामाचा खर्च भांडार विभागाकडील कोवीड-19 या लेखाशीर्षातून करणेकामी येणा-या र.रू.43,14,031/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४ | विषय क्रमांक - ०३
दिनांक - ०३/१२/२०२१ | विभाग - विद्युत विभाग
सुचक - मा.संगिता ताम्हाणे | अनुमोदक - मा.कोमल मेवानी

संदर्भ - मा.सह शहर अभियंता (वि) यांचेकडील पत्र क्र.वि/गक्षेका/वि/कावि२/९०/२०२१, दि.१०/११/२०२१.

मा. सह शहर अभियंता (वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

निवडणूक विभागाकडील पत्र क्र.सार्व.नि.२०२२/कावि/१३/२०२१, दि.१२/१०/२०२१ अन्वये मनपाच्या संभाव्य निवडणूक २०२२ ची पूर्वतयारी म्हणून निवडणूक निर्णय कार्यालय, मतमोजणी कार्यालय, निवडणूक केंद्र इ. ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी कामाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. ग क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणा-या निवडणूक कार्यालय, मतमोजणी कार्यालयात आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनीक्षेपण व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही आणि जनरेटर व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याकामी विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यास र.रू.24,99,542/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सबब या कामी र.रू.25,00,000/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५ | विषय क्रमांक - ०४
दिनांक - ०३/१२/२०२१ | विभाग - आकाशचिन्ह परवाना
सुचक - मा.कोमल मेवानी | अनुमोदक - मा. संगिता ताम्हाणे

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/३/कावि/६६/२०२१, दि. १२/११/२०२१.

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत शहरामध्ये खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर बाह्य जाहिरातीसाठी फलक लावणेस (OutdoorAdvertising) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील कलम २४४, २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार परवानगी दिली जाते. सध्या पिंपरी चिंचवड शहराचा

स्मार्ट सिटीत समावेश झाला आहे. महापालिकेचे २०१८ मध्ये जाहिरात फलकासाठी (OutdoorAdvertising) बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) ठरविणेत आलेले आहे. त्यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश व शहर सौंदर्यीकरण तसेच महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी नव्याने जाहिरात धोरण निश्चित करणे आवश्यक आहे म्हणून नव्याने जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) तयार करणेत आलेले आहे. त्यास कायदा विभागाकडून तपासून घेणेत आलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत तयार करणेत आलेले बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये (मराठी व इंग्रजी) यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दफ्तरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०३/१२/२०२१

सुचक - मा.कोमल मेवानी अनुमोदक - मा.संगिता भोंडवे

संदर्भ - मा.कोमल मेवानी व मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१ मोरेवस्ती येथील भावेश्वरी हौसिंग सोसायटी मधील सिमेंट कॉंक्रिट व ब्लॉक करणेस आदरणीय खासदार अमोलजी कोल्हे यांच्या निधीतुन सुरु कलेले असल्यामुळे त्याठिकाणी महापालिका (फ प्रभाग स्थापत्य) मार्फत जे निविदा नोटीस क्र.८१/०३/२०२० - २०२१ द्वारे प्रसिद्ध करुन मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रायवेट लिमिटेड, चिंचवड यांना कामाचे आदेश क्र.स्था/नि/फ/मुख्य/५५५/२०२१, दि.२४/०६/२०२१ अन्वये दिलेले होते. त्याचे कॉंक्रिटीकरण/ब्लॉक बसविण्याच्या कामाच्या बदल्यात इतरत्र ठिकणी (स्थळ बदलास) काम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०३/१२/२०२१

सुचक - मा.वसंत बोराटे अनुमोदक - मा.संगीता ताम्हाणे

संदर्भ - मा.वसंत बोराटे व मा.संगीता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.

पि.एम.पी.एल. मधील पुर्व पीसीएमटी चे वर्कशॉप विभागातील ११४ सेवकांनी त्यांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घेणेकामी विनंती केली आहे. या पुर्वी पीसीएमटी कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महापालिका मध्ये वर्ग करुन घेणेत आले आहे. त्याच प्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळातील एकुण १३ आगारामध्ये कार्यशाळेकडील विविध विभागामध्ये पुर्व पिसीएमटी चे कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. अशा उर्वरित ११४ सेवकांना पुर्वीच्या कर्मचा-यांप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४०% हिश्या मधून वेतन अदा करित असल्याने यापुर्वी करणेत आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर उर्वरित पुर्व पीसीएमटी कार्यशाळा सेवकांना त्याच हिश्यामधून वेतन होणे विषयी कोणतेही हरकत नाही. सबब सोबतचे प्रपत्र 'अ' प्रमाणे ११४ पुर्व पिसीएमटी कडील कार्यशाळा सेवकांचे कोणतेही आर्थिक नुकसान न होता महापालिकेमध्ये कायम स्वरुपी वर्ग करुन घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०३/१२/२०२१

सुचक - मा.संगिता भोंडवे अनुमोदक - मा.कोमल मेवानी

संदर्भ - मा.संगिता भोंडवे व मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव.

निविदा क्र.५६/१५,२०२१-२२, प्रभाग क्र.१३ साईनाथ नगर व प्रभागातील विविध ठिकाणी जुने पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसवून स्थापत्य विषयक कामाचा आदेश ठेकेदारास देणेत आलेला असून अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही. प्रभाग क्र.१३ मधील विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे व दुरुस्त करणेचे काम आवश्यक असल्याने सन २०२१-२२ चा अंदाजपत्रकात त्याची निविदा कार्यवाही पुर्ण झालेली आहे. प्रभाग क्र.१३ मधील स्थानिक रहिवाशी इतर नगरसदस्य, जेष्ठ नागरिक तसेच इतर सामाजिक कार्यकर्ते निगडी येथील हत्ती चौकातील (श्री राम चौक) पोस्ट कॉलनीकडे जाणा-या रस्त्यावर प्रवेशद्वाराची मागणी करत आहे. तसेच त्यामुळे परिसरात कोणत्याही प्रकारच्या वाहतुकीस

अडथळा होत नाही तसेच देखभाल दुरुस्ती कामातून प्रवेशद्वाराचे काम होत असल्याने त्याचा मनपावर आर्थिक भार देखील पडणार नाही. तरी प्रभाग क्र.१३ साईनाथ नगर व प्रभागातील विविध ठिकाणी जुने पेव्हींग ब्लॉक दुरुस्त करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसवून स्थापत्य विषयक या कामातून निगडी यमुनानगर येथील हत्ती चौकात नव्याने श्री राम चौक पोस्ट कॉलनीकडे जाणा-या रस्त्यावर प्रवेशद्वार बांधण्याच्या कामास सुधारित तांत्रिक मान्यतेसह काम करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/५४७/२०२१
दिनांक : ०६/१२/२०२१

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**(विषय क्र. ६ चे लगत)**

**पि.एम.पी.एम.एल. कर्मचारी माहिती तक्ता**

**प्रपत्र 'अ'**

| अ.क्र. | सेवकांचे नाव | पदनाम | कर्मचारी क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | हनुमंत शेलार | फिटर | 3103 |
| 2 | बाळु भिलारी | हेल्पर | 3128 |
| 3 | गुंडाभाऊ ओतारी | हेल्पर | 3362 |
| 4 | अंकुश कापसे | हेल्पर | 3368 |
| 5 | योगेंद्र सिंग | हेल्पर | 3371 |
| 6 | विजय शेळके | हेल्पर | 3386 |
| 7 | भगवान मांजरे | हेल्पर | 3417 |
| 8 | अरुण बोत्रे | फिटर | 3422 |
| 9 | लक्ष्मण तापकीर | फिटर | 3444 |
| 10 | विलास चिंचवडे | हेल्पर | 3116 |
| 11 | जिजाबा पाटील | हेल्पर | 3122 |
| 12 | विलास पालांडे | हेल्पर | 3131 |
| 13 | सुधीर साठे | हेल्पर | 3135 |
| 14 | दिलीप डांगे | हेल्पर | 3136 |
| 15 | अशोक ससाणे | हेल्पर | 3149 |
| 16 | ज्ञानेश्वर येवले | हेल्पर | 3152 |
| 17 | शाम शिंदे | हेल्पर | 3154 |
| 18 | भानुदास लांडगे | हेल्पर | 3375 |
| 19 | सुनिल मिर्झापुरे | हेल्पर | 3376 |
| 20 | सुरेश टकुराणी | हेल्पर | 3378 |
| 21 | रावसाहेब जाधव | हेल्पर | 3379 |
| 22 | विजय काटे | हेल्पर | 3392 |
| 23 | शिवाजी दळवी | हेल्पर | 3394 |
| 24 | लक्ष्मण डोंगरे | हेल्पर | 3433 |
| 25 | चंद्रकांत जाधव | हेल्पर | 3130 |
| 26 | श्रीकांत गावडे | हेल्पर | 3387 |
| 27 | दिपक कुंभार | हेल्पर | 3391 |
| 28 | किशिन लुल्ला | हेल्पर | 3407 |
| 29 | गोविंद देवकर | हेल्पर | 3434 |
| 30 | नानासाहेब सोनावणे | हेल्पर | 3119 |
| 31 | ज्ञानेश्वर शिवले | हेल्पर | 3401 |
| 32 | मुरलीधर गव्हाणे | हेल्पर | 3439 |

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | हनुमंत लांडगे | हेल्पर | 3405 |
| 34 | मोहन जाधव | हेल्पर | |
| 35 | सिद्धार्थ ओव्हाळ | हेल्पर | 3138 |
| 36 | दिपक जागळेकर | हेल्पर | 3139 |
| 37 | गणेश लवांडे | हेल्पर | |
| 38 | राजू लोंढे | हेल्पर | 3143 |
| 39 | संजय डोळस | हेल्पर | |
| 40 | बाळू गोटे | हेल्पर | 3043 |
| 41 | अशोक शिवरकर | हेल्पर | |
| 42 | सोपान दिघे | हेल्पर | 3153 |
| 43 | तुकाराम कोल्हे | हेल्पर | 3147 |
| 44 | गणेश फुगे | हेल्पर | 3143 |
| 45 | सदाशिव चव्हाण | हेल्पर | 3018 |
| 46 | बाळु कांबळे | हेल्पर | 3037 |
| 47 | देविदास बालवडकर | हेल्पर | 3072 |
| 48 | संजय कोंडे | हेल्पर | 3466 |
| 49 | बबुशा गाडे | हेल्पर | 3423 |
| 50 | विनायक लांडगे | हेल्पर | 3159 |
| 51 | तानाजी खंडागळे | हेल्पर | 3369 |
| 52 | संजय पिसाळ | हेल्पर | 3045 |
| 53 | बाळु कांबळे | हेल्पर | 3037 |
| 54 | प्रेनायर. | हेल्पर | 3474 |
| 55 | राजाराम नथु लोंढे | फिटर | 3062 |
| 56 | पंडीत भंडारे | हेल्पर | 3060 |
| 57 | विलास तांगडे | हेल्पर | 3085 |
| 58 | हरिष छाब्रिया | हेल्पर | 3075 |
| 59 | राजू मुलानी | हेल्पर | 3081 |
| 60 | संजय मोहिते | हेल्पर | 3054 |
| 61 | भिमराव कांबळे | हेल्पर | 3055 |
| 62 | शिवाजी घुले | हेल्पर | 3069 |
| 63 | राजु तापकिर | हेल्पर | 3066 |
| 64 | रमेश राऊत | हेल्पर | 3014 |
| 65 | रशिकांत टींगरे | हेल्पर | 3124 |
| 66 | उत्तम काळे | हेल्पर | 3071 |
| 67 | अंकुश दवणे | हेल्पर | 3073 |
| 68 | लक्ष्मण ननावरे | क्लिनर | 3096 |

| | | | |
|---|---|---|---|
| 69 | सुहास दाभाडे | क्लिनर | 3088 |
| 70 | कैलास गव्हाणे | क्लिनर | 3093 |
| 71 | सुभाष बटवाल | क्लिनर | 3429 |
| 72 | अनिल लांडगे | क्लिनर | 3070 |
| 73 | सुनिल काटे | हेल्पर | 61023 |
| 74 | राजेंद्र लांडे | हेल्पर | 3001 |
| 75 | इंद्रजित मिनीकर | क्लिनर | 3007 |
| 76 | अनिल गवळी | हेल्पर | 3462 |
| 77 | दिगंबर मेंगडे | हेल्पर | 3013 |
| 78 | विजय किंडरे | हेल्पर | 3015 |
| 79 | सयद काझी | हेल्पर | 3017 |
| 80 | विठ्ठल साखरे | हेल्पर | 3019 |
| 81 | खंडेराव धुमाळ | हेल्पर | 3020 |
| 82 | संजीवकुमार गायकवाड | हेल्पर | 3021 |
| 83 | गुलाब आढाव | हेल्पर | 3026 |
| 84 | राजेंद्र आल्हाट | हेल्पर | 3027 |
| 85 | अरुण श्रीवास्तव | हेल्पर | 3029 |
| 86 | रमेश भाताडे | हेल्पर | 3030 |
| 87 | निळकंठ निमगावकर | हेल्पर | 3032 |
| 88 | सन्मानसिंग ठाकूर | क्लिनर | 3040 |
| 89 | सतिश चव्हाण | क्लिनर | 3042 |
| 90 | रमाकांत शिंदे | क्लिनर | 3044 |
| 91 | सुरेंद्र ठकार | हेल्पर | 3047 |
| 92 | हिरामण अल्हाट | हेल्पर | 3057 |
| 93 | राजाराम गव्हाणे | हेल्पर | 3059 |
| 94 | सुहास कदम | क्लिनर | 3100 |
| 95 | बाबसाहेब मुलाणी | क्लिनर | 3121 |
| 96 | बुराण शेख | क्लिनर | 3129 |
| 97 | तुकाराम बवले | क्लिनर | 3181 |
| 98 | रामचंद्र भाट | हेल्पर | 3187 |
| 99 | रसुल मुंडे | क्लिनर | 3287 |
| 100 | लक्ष्मण नखाते | क्लिनर | 3409 |
| 101 | शंकर काळभोर | क्लिनर | 3416 |
| 102 | विजय जाधव | हेल्पर | 3421 |
| 103 | अशोक नामदे | क्लिनर | 3425 |
| 104 | अर्जुन चौघुले | क्लिनर | 3427 |

| | | | |
|---|---|---|---|
| 105 | नंदकुमार यादव | क्लिनर | 3449 |
| 106 | राधाकृष्ण नायर | फिटर | 3462 |
| 107 | नारायण पांचाळ | क्लिनर | 3077 |
| 108 | श्रीमती सविता शंकर कर्पे | सफाई कर्मचारी | |
| 109 | श्रीमती लिलाबाई रत्नाकर लंघे | सफाई कर्मचारी | |
| 110 | श्रीमती गिता सासवडकर | सफाई कर्मचारी | |
| 111 | श्रीमती सुरेखा शिंदे | सफाई कर्मचारी | |
| 112 | मंदाकिनी भोईर | सफाई कर्मचारी | |
| 113 | लक्ष्मीबाई गाढवे | सफाई कर्मचारी | |
| 114 | अलका वंजारे | सफाई कर्मचारी | |

सही/-

**(स्वीनल कपिल म्हेत्रे )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.